नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३१/१०/२०२६ (शुक्रवार)

नागपूर ग्रामीण जिल्हया साठी एकात्मिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रकल्पास मंजुरी
महाराष्ट्रातील पहिला ग्रामीण सीसीटीव्ही प्रकल्प

नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करणे, गुन्हेगारीवर वचक बसवणे, गुन्ह्यांचा तपास गतिमान करणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री देण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या कार्यक्षेत्रातील १८ प्रमुख शहरांमध्ये अत्याधुनिक एकात्मिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स यंत्रणा उभारण्याच्या प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने रु. १३६,२९,९२,४३३/— (रुपये १३६ कोटी २९ लाख ९२ हजार ४३३) इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दिली आहे.

नागुपर ग्रामीण पोलीस दलाकडुन मा. ना. श्री देवेंद्र फडवणीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपुर जिल्हा, मा. श्रीमती मनीषा पाटणकर — म्हैसकर, अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र राज्य तसेच मा. श्री सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत. नागपूर ग्रामीण जिल्ह्याच्या सुरक्षा व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी या महत्त्वपूर्ण प्रकल्पास मंजुरी प्रदान केल्याबद्दल नागपूर ग्रामीण पोलीस दल त्यांच्या मोलाच्या सहकार्याबद्दल, मार्गदर्शनाबद्दल व पाठबळाबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

या प्रकल्पाचा शासन निर्णय दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी निर्गमित झाला असून, मा.ना.श्री.चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपुर जिल्हा यांच्या उपस्थितीत या प्रकल्पाची घोषणा करण्यात आली. नागपुर ग्रामीण पोलीस क्षेत्रातील १८ शहरांना एकात्मिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणालीच्या माध्यमातून जोडणारा हा महाराष्ट्रातील अशा स्वरूपाचा पहिलाच महत्त्वपूर्ण व अभिनव प्रकल्प ठरणार आहे.

नागपूर ग्रामीण जिल्हयातील वाढती नागरी सुरक्षा व आधुनिक तंत्रज्ञानाची गरज विचारात घेऊन मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाचा सविस्तर व तांत्रिकदृष्ट्या सक्षम प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठवण्यात आला होता. सदर प्रकल्पांतर्गत उमरेड, बुटीबोरी, कन्हान पिपरी, रामटेक, नरखेड,

कळमेश्वर, खापा, मोवाड, मौदा, भिवापूर, पारशिवनी, कुही, कांद्री, कोंढाळी, मोहपा, काटोल, वडोदा आणि सावनेर या १८ शहरांचा समावेश करण्यात आला आहे.

या प्रकल्पामध्ये शहरांमधील ५८८ क्षेत्रीय ठिकाणी एकूण १,७४४ पेक्षा जास्त कॅमेरे बसवले जातील, ज्यामध्ये १,४३० स्थिर कॅमेरे, २१७ ANPR (Automatic Number Plate Recognition) कॅमेरे आणि ९७ PTZ (Pan-Tilt-Zoom) कॅमेऱ्यांचा समावेश आहे. प्रत्येक तालुक्यासाठी १८ तालुका विश्लेषण व निरीक्षण केंद्र TAMU (Taluka Analysis and Monitoring Unit) स्थापन केले जातील, जिथे ३० दिवसांचे स्थानिक रेकॉर्डिंग जतन राहील. तसेच पोलीस मुख्यालयात 1.8 PB क्षमतेचा केंद्रीय बॅकअप असेल, ज्यामध्ये महत्त्वाचे (फ्लॅग केलेले) चित्रीकरण ६० दिवसांपर्यंत सुरक्षित ठेवले जाईल.

या प्रणालीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून यामध्ये ANPR, चेहरा ओळख, अनधिकृत प्रवेश, संशयास्पद वावर, बेवारस वस्तू तसेच हिंसा आणि शस्त्र ओळख यासारख्या बाबींवर तात्काळ सूचना (Alerts) मिळण्याची सुविधा असेल. संपूर्ण यंत्रणा ऑप्टिकल फायबर व MPLS(Multiprotocol Label Switching) जोडणीने जोडलेली असेल, ज्यामुळे नेटवर्क खंडित झाल्यासही स्थानिक रेकॉर्डिंग अखंडित सुरू राहील. यासोबतच सार्वजनिक घोषणा व गर्दी व्यवस्थापनासाठी बाह्य घोषणा यंत्रणा (PA) देखील बसवली जाणार आहे.

या प्रकल्पामुळे गर्दीची ठिकाणे व संवेदनशील क्षेत्रांवर २४ तास देखरेख ठेवणे शक्य होणार असून गुन्हेगारीला प्रभावी आळा बसेल, तपासाला गती मिळेल आणि पुरावाधारित पोलीसिंग मजबूत होईल. तसेच वाहतूक नियंत्रण, रस्ते सुरक्षा, महिला सुरक्षा आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने प्रतिसाद देणे पोलीसांना अधिक सुलभ होणार आहे.नागपूर ग्रामीण पोलीस दल हे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सदैव कटिबद्ध असून या आधुनिक प्रणालीमुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होण्यास मदत होणार आहे.

नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या पोलीस उपअधीक्षक पूजा गायकवाड यांना उत्कृष्ट तपासासाठी केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२६ जाहीर

नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या आस्थापनेवरील आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस उपअधीक्षक श्रीमती पूजा गायकवाड यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२६ जाहीर झाले आहे. उत्कृष्ट तपास या श्रेणीमध्ये त्यांची या प्रतिष्ठित पदकासाठी निवड झाली आहे.

दिनांक २१/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन उमरेड येथे अप क्र. ४५१/२३ कलम ३७६ (डीबी), ३७६ (२) (एन), ३७७, ५०६ भादंवि सहकलम ५(जी), ५(एल), ५(एम), ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.या प्रकरणी अल्पवयीन बालीकेवर सामुहीक लैंगिक

अत्याचार करणाऱ्या ४ आरोपींना मा. न्यायालयाकडुन आजीवन कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

पोलीस उपअधीक्षक पूजा गायकवाड यांनी सदर गुन्हयाचे तपास कार्यामध्ये दाखविलेली व्यावसायिक कुशलता, तपासातील बारकाई, पुराव्यांचे शास्त्रोक्त संकलन, विश्लेषणात्मक दृष्टिकोन तसेच कर्तव्याप्रती असलेली निष्ठा या बाबींची दखल घेऊन त्यांना या प्रतिष्ठित पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे.

केंद्रीय गृहमंत्रालयाकडून उत्कृष्ट तपास कार्यासाठी दिला जाणारा हा सन्मान त्यांच्या कर्तृत्वाची आणि तपास कौशल्याची राष्ट्रीय स्तरावर घेतलेली दखल आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी पूजा गायकवाड यांचे या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



पोलीस उपअधीक्षक श्रीमती पूजा गायकवाड

नागपूर ग्रामीण पोलीस दलात राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त 'एकता परेड २०२६' चे थेट प्रक्षेपण

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच मा. श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ३१/१०/२०२६ रोजी राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त गुजरात राज्यातील एकतानगर येथे भारताचे पंतप्रधान मा. ना. श्री. नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या एकता परेड २०२६ या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये करण्यात आले.

महाराष्ट्र पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्राप्त निर्देशानुसार, नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सदर कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणासाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती. या माध्यमातून पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पाहून त्याचे अवलोकन केले.

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय एकता दिवसाच्या माध्यमातून देशाची एकता, अखंडता व सुरक्षितता अबाधित राखण्याचा संकल्प करण्यात आला. तसेच राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि देशसेवेची भावना अधिक दृढ करण्याचा संदेश यानिमित्ताने देण्यात आला.




LIVE
एकता नगर में एकता परेड का आयोजन


NATIONAL CADET


JAY MALHAR


OCTOBER 2026
राष्ट्रीय
सायबर सुरक्षा
जनजागृती महिना




By bickvicom Wadoda,Nagpur Division


महसूल लोक अदालत अभिया
उपविभागीय अधिकारी, कार्यालय रामटेक व
तहसिल कार्यालय, रामटेक



नागपूर ग्रामीण जिल्हयात राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त 'राष्ट्रीय एकता दौड' उत्साहात संपन्न

नागपूर ग्रामीण गृहमंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली तर्फे तसेच मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेशन्वये दिनांक ३१/१०/२०२६ रोजी लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची १५१ व्या जयंती साजरी करण्यानिमित्त ''रन फॉर युनिटी', ''वॉक फॉर युनिटी'' राष्ट्रीय एकता दौड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

त्या अनुषंगाने नागरिकांमध्ये देशप्रेमाची, शिस्तीची, जबाबदारीची आणि एकतेची भावना निर्माण होण्याच्या हेतूने मा. श्री. हर्ष ए पोद्दार वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण आणि मा. श्री. अनिल म्हस्के अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण मधील सर्व २४ पोलीस स्टेशन येथे पोलीस स्टेशन स्तरावर उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन चे इतर पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार तसेच परिसरातील नागरिक, शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पोलीस स्टेशन हद्दीतील प्रमुख रस्ते, लोकवस्ती व बाजार परिसरातून 'रन फॉर युनिटी', 'वॉक फॉर युनिटी' हे कार्यक्रम आयोजित करून तसेच 'राष्ट्रीय एकतेची शपथ घेवून अतिशय उत्साहात सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली.




ORBIT
WIRES & CABLES


पोलीस स्टेशन नरखेड
जिल्हा नागपूर ग्रामीण
राष्ट्रीय
एकता दौड
एक देश... एक भावना...
राष्ट्रीय एकता हीच खरी शक्ती...
दिनांक
31/10/2026
चला, एकतेच्या पावलांनी पुढे जाऊया...


RR KABEL
WIRES & CABLES
SWITCHES • SWITCHGEARS
FANS • LIGHTING • APPLIANCES
महाराष्ट्र पोलीस
पोलीस स्टेशन जलालखेडा
दुरध्वनी क्र. : 7105-2385285
जि. नागपुर (ग्रा.)
RR KABEL
WIRES & CABLES
SWITCHES • SWITCHGEARS
FANS • LIGHTING • APPLIANCES





अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्री विरोधात कळमेश्वर पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाची संयुक्त विशेष मोहीम

गौंडखैरी पारधी बेडा येथे कारवाई करत ८ लाख २८ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलस अधिकारी, सावनेर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ३०/१०/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाने मौजा गोंडखैरी पारधी बेडा येथे संयुक्तपणे मोठी कारवाई केली.

कळमेश्वर तालुक्यातील गोंडखैरी पारधीवेडा येथे अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेदरम्यान हातभट्टी दारू तयार करणाऱ्या ठिकाणांवर छापे टाकण्यात आले. या कारवाईत कळमेश्वर पोलिसांनी १८८०० लिटर सडवा, २१० लिटर मोहाफुल दारू तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण ७,२६,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करून १० आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण १० गुन्हे नोंदविण्यात आले आहे. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने ७ गुन्हे नोंदवून २६२० लिटर रसायन सह एकुण १,०२,५००/— रूपयंचा मुद्देमाल जप्त केला .दोन्ही विभागांच्या

संयुक्त कारवाईत एकूण ८,२८,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला आहे.

अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ३१ गुन्हे दाखल,

दिनांक ३०/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ३१ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन देवलापार येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे १० गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे ०१ गुन्हा नोंद.

नमुद कारवाईत एकुण २६१० मिली देशी दारू, २७१ लीटर मोहाफुल दारू, २०२०० लीटर मोहाफुल सडवा, इतर साहित्य असा एकुण ८०९२००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७०३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७०३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

नागपुर उपविभाग :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे २९ आरोपी अशा एकुण ८८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

उमरेड उपविभाग :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २६ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १० आरोपी अशा एकुण १३३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

सावनेर उपविभाग :— सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १५ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १६ आरोपी, अशा एकुण १३९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

कन्हान उपविभाग :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १४ आरोपी अशा एकुण ६८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

रामटेक उपविभाग :— रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २४ आरोपी अशा एकुण १२३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

काटोल उपविभाग :— काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४७ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २५ आरोपी अशा एकुण १५२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.







जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर